

# मुमुक्षूसाठी

प. पू. सद्‌गुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज
गिरगांव–मुंबई

अनेक तऱ्हेच्या दुःखाने भरलेल्या, या जन्म-मृत्युरुप संसारांतून तरून जाण्यासाठीच, भगवंताच्या **विशेष कृपेने जीवाला मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे.** परंतु श्रेष्ठ असा मनुष्य जन्म प्राप्त झालेला जीव ज्यामुळे सर्व दुःखांचा नाश होईल; श्रेयस कर्मांचा विचारहि न करता कामोपभोगालाच जीवनाचे परम ध्येय मानतो. विषयांच्या आसक्तिने कोणत्याही प्रकारे केवळ विषयांचीच प्राप्ति करून घेऊन, त्यांच्या यथेच्छ उपभोगातच जे रममाण होतात, ते वस्तुतः आत्महत्या करणारेच आहेत ! कारण अशा प्रकारे आपल्या पतनाला स्वतःच कारणभूत झालेले हे लोक, आपले जीवनच व्यर्थ घालवित नाहीत तर आपल्याला आणखी कर्मबंधनात जखडून अधिक दुःखी होत असतात. अशा तऱ्हेच्या लोकांनी या जगात केवढेहि मोठे नांव–लौकिक, धन-यश-किर्ती वैभव अधिकार प्राप्त केला असला तरीही मरणानंतर कर्मांच्या फलस्वरूप परत परत विभिन्न शोक संतापपूर्ण योनीमध्ये त्यांना भटकावे लागून दुःखच सोसावे लागते.

**कर्म उपासना याद्वारे धन, यश, किर्ती, वैभव, अधिकार ही भौतिक सुखे प्राप्त होऊन जरी क्षणैक दु.खाची निवृत्ती होत असली तरी त्यापासून मनुष्याला नित्य सुख-शांती प्राप्त होणार नाही.** ज्यांना अक्षय सुखाची प्राप्ति व्हावी असे वाटत असेल, अशा प्रत्येक मनुष्याने सर्व प्रकारची दुःखे ज्यामुळेनिर्माण होतात, त्यांच्या कारणांचाच समुळ नाश करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. परंतु सर्व दुःखांच्या मुळाचा नाश कसा होणार ? विविध दुःखांच्या मुळाचा नाश केल्याशिवाय हे संभवत नाही. म्हणून प्रत्येक मनुष्याने दुःखाचे मूळ कारण कोणते ? याचा सर्वप्रथम शोध घेतला पाहिजे.

दुःखाच्या मुळांचा शोध घेत असताना प्रश्ना मागून प्रश्न उपस्थित होऊन सामान्य जीव संभ्रमात पडतो. परंतु आपल्या तत्त्वज्ञानी महापुरुषांनी त्यांची उत्तरे दिलेली आहेत. आपली शास्त्रे आपणास सांगतात की **जन्म हेच दुःखाचे मूळ आहे.** जो पर्यन्त शरीर आहे, तो पर्यन्त दुःखाचे निवारण होणार नाही. जन्मापासून देहत्यागापर्यन्त मनुष्याची मनःस्थिती परिस्थितीप्रमाणे बदलत असते. शरीर आहे तोपर्यन्त दुःखाचे निवारण होणार नाही. दुःखाचे मूळ कारण जन्मच आहे. मग आपल्याला प्रश्न असा पडतो की **जन्माचे मुळ कारण काय ?**

**हरिमार्ग सार येणेची तरिजे । येरवी उभिजे संसार रया ।।**

शास्त्राने दिलेले उत्तर असे आहे की **जन्माचे मूळ कारण कर्म** ! जर मनुष्य कर्मरहित होईल तर त्याची दुःखापासून सहज सुटका होईल. पण सर्वथा कर्मत्याग असंभव आहे. फक्त आत्मस्वरुपात सतत रममाण असणाऱ्या साक्षात्कारी महान विभूतीनांच कर्मत्याग संभवतो, अन्य लोकांना नाही; व **मुमुक्षूजनांनी कर्म त्यागाचा विचारही करू नये**. दुसरी गोष्ट अशी आहे की पूर्व जन्मकृत कर्मे व या जन्मी केलेली कर्मे यांचे जे मूळ आहे; त्यांचा नाश केल्याशिवाय कर्मविरामाचा संकल्प केवळ बोलण्याचीच गोष्ट होईल. मग **या कर्माचे मूळ कोणते** त्याचे उत्तर राग (प्रेम) द्वेष, भय हे कर्माचे मूळ आहे. जो पर्यन्त राग किंवा द्वेष एखाद्या गोष्टीविषयी असतो, तो पर्यन्त त्या वस्तूची प्राप्ति किंवा त्यागासाठी जीव प्रयत्नपूर्वक कर्म करीत असतो, व ज्यापासून भय निर्माण होते, त्या भयापासून आपली सुटका करुन घेण्यासाठी जीव धडपडत असतो. **राग, द्वेष, भय हे जे दोष आहेत, त्या दोषाचे मूळ कारण आपणाहून अतिरिक्त दुसऱ्याचे भान असणे, हेच सर्व दोषांचे मूळ आहे**. जर दुसऱ्या वस्तूंचे भान नसेल तर कर्माला कारण असणाऱ्या राग, द्वेष, भय या दोषांना कोणताही आधार न राहिल्याने भयादि दोषांचे प्रसंगच निर्माण होणार नाहीत. शेवटी प्रश्न असा निर्माण होतो कि आपणांहून अतिरिक्त म्हणजे **द्वैताचे भान कोणत्या कारणाने होते ?** महात्मे त्याचे उत्तर देतात कि **'द्वैत' हे मिथ्या ज्ञानामुळे भासते. मिथ्या ज्ञान हेच संसार बंधनाचे बीज आहे** या मिथ्या ज्ञानामुळेच आत्मा आपल्या स्वरूपाला विसरुन जीव-दशेला प्राप्त झाला आहे. जप, तप, पुजा इत्यादी भगवद्दोपासना मनोनिग्रह हे शास्त्रांत वर्णिलेले सर्व मार्ग, ज्या मूळ अज्ञानामुळे जीव सुख-दुःखाच्या भोवऱ्यात सापडलेला आहे. त्याला ज्ञान होवून अद्वैत साक्षात्कार प्राप्त व्हावा यासाठी केलेल्या सोपानाच्या पायऱ्यांतील पहिल्या पायऱ्या आहेत. **ज्ञानच अज्ञानाला विरोधक आहे**. या अज्ञानातून आपल्याला बाहेर पडायचे असेल तर पाण्यांत पडलेल्या मनुष्याला किनाऱ्यावर येण्यासाठी पाण्याचाच उपयोग करावा लागतो, तद्वतच या अज्ञानांतून सुटका होण्यासाठी या अज्ञान मूलक जगाचाच आपल्याला उपयोग करून घेणे भाग आहे.

**कर्मापासून सर्वस्वी सुटका होणे असंभव आहे**. मनुष्य सात्विक, राजस व तामस अशी तीन प्रकारची कर्मे करीत असतो. त्याची फळे त्याला भोगभूमिमध्ये भोगावी लागतात. या संसारात केलेल्या शुभा-शुभ कर्माचे क्षणभंगूर शिल्लक राहिलेले फळ जीवाला अन्यत्र भोगावे लागते. इष्टानिष्ट कर्मे कोणती याची निवड करण्याची समज परमेश्वराने अन्य प्राण्यांच्या शरीराहून श्रेष्ठ असे मानवी शरिर प्राप्त झालेल्या जीवाला दिलेली आहे. **लौकिक सुखासाठी किंवा स्वर्गसुखासाठी केली जाणारी सर्व प्रेयस कर्मे जीवाला बंधनकारक ठरतात.**

## –: चैतन्यतुषार :–

**तस्मान्मनः कारणमस्य जन्तोर्बन्धस्य मोक्षस्य च वा विधाने ।**
**बन्धस्य हेतुर्मलिनं रजोगुणै र्मोक्षस्य शुद्धं विरजस्तमस्कम् ॥**

**मनच या जीवाला बंधात घालण्यास आणि त्यातून सोडविण्यास कारण आहे. मन जर रजोगुणाने आणि तमोगुणाने मलिन झाले तर तें बंधास कारण आहे. आणि तेच जर रजोगुण आणि तमोगुण यांनी रहित अर्थात् शुद्ध होईल तर ते मोक्षास कारण होते.**

संग्राहक
–हरीष चव्हाण

**हरीविण देवो नाही नाही जनी । अखंड पर्वणी हरि जपता ॥**

संसार कर्मप्रधान आहे; कोणत्या तरी फळाच्या अपेक्षेने केलेल्या कर्मामध्ये दोष उत्पन्न होतात. ज्या इच्छेने कर्म केले जाते त्याचे फळ प्राप्त न आल्यामुळे त्याचा परिणाम राग, व्देष, भय, काम, क्रोध इत्यादी इंद्रिय सुखाच्या रूपाने प्रकट होतात. व या कर्मामूळेच जीव बंधनात पडतो. परंतु कर्म केल्याशिवाय बंधनात पडलेल्या जीवाला मुक्ति प्राप्त होत नाही. कर्मयोगाच्या अनुष्ठानाद्वारे प्रत्येक कर्म इश्वरार्पण बुद्धिने करित राहिल्यास आत्मज्ञान उदय पावेल. परमेश्वराची प्रसन्नता प्राप्त करण्याच्या दृष्टीने जी कर्मे केली जातात त्याला यज्ञ समजले जाते. ज्ञानाचा उदय झाल्यावर सर्व कर्मांची समाप्ति होते. सर्व कर्मांचे भस्म या ज्ञानरूपी अग्निमुळे होते.

ज्ञानासारखे दुसरे काही नाही. निष्काम कर्मानुष्ठानाद्वारे कामक्रोधावर जय प्राप्त करून सर्वाप्रती सद्भाव व इंद्रियावर नियंत्रण ठेवता येते. अखिल विश्वब्रह्माण्डात जे काही जडचेतन आहे, ते सर्व त्या सर्वशक्तिमान गुणस्वरुप परमेश्वराने व्याप्त आहे. ईश्वर सतत आपल्याबरोबर आहे, त्याचे सदासर्वदा स्मरण करीत या जगतामध्ये त्यागभावनेने केवळ कर्तव्य पालनासाठी विषयांचे यथाविधी सेवन केले पाहिजे. विषयामध्ये मनाला फसू न देता ईश्वरार्पण बुद्धिने कर्माचे आचरण केले पाहिजे.

नित्य सत्ता, नित्य चैतन्य, नित्य आनंद हे ज्याचे स्वतःचे स्वरूप आहे असा जगतांतील प्रत्येक प्राणि हा सच्चिदानंदघन परमेश्वराचा अंश आहे. परंतु या व्यवहारातीत लक्षापर्यंत पोहोचणे निरंतर व्यवहारामध्येच आसक्त झालेल्या विषयी जीवांना अत्यंत कठीण आहे. यासाठी ब्रम्हनिष्ठ सद्गुरूंचा कृपाप्रसाद प्राप्त करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. राग-द्वेष, भय क्रोधादि विकारांपासून निवृत्त झाले पाहिजे तरच अशा जीवांना प्रपंचातील अव्दैत पदाचा बोध होवू शकतो. जर या विशुद्ध आत्मतत्त्वांचा जीवाला बोध झाला तर तो महात्मा सर्वथा निर्भय-निर्द्वंद्व होतो. हे अन्तरबाह्य सर्वत्र एका आत्मतत्त्वाचीच अनुभूति घेत त्यातच रममाण होतो. अशी बोधस्थिति प्राप्त झालेला महात्मा कधिही तत्वापासून पतन होत नाही. व अशी स्थिति प्राप्त करुन घेण्यासाठीच जिज्ञासूंनि निकराने प्रयत्न केले पाहिजे. अशी स्थिती प्राप्त झाल्यावर मनुष्यप्राणि कृतकृत्य होतो.

---

## अहं ब्रह्मास्मी !

मनुष्याच्या ठिकाणी अपवित्रता त्याच्या ठिकाणच्या देहतादात्म्यामुळे मुख्यतः आलेली असते. 'देहो ऽ हम्' हे स्फुरण घालविण्याकरिता 'शिवो ऽ हम्' हे स्फुरण ध्यानाने आणावे लागते. परंतु काही कालानंतर 'शिवो ऽ हम्' हेही स्फुरण जावे लागते. शरीराच्या दृष्टीने ज्याप्रमाणे माती हा मळ आहे त्याचप्रमाणे अत्तर हाही मळच आहे, कारण तेही विजातीय द्रव्य आहे. तद्वतच स्वरूपाच्या दृष्टीने 'मी देह आहे' हे स्फुरण अविद्येचा मळ आहे व मी ब्रह्म आहे. हे स्फुरण विद्येचा मळ आहे.

– दांडेकर मामा . . .

संग्राहक – ह. भ. प. वि. ग. ढमाले

---

जपता कुंटिणी उतरे विमान । नाम नारायण आले मुखा ।।

---